# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXIV YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, OCTOBER 2022 No. 09


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

स्तोत्र : ७३:१-१०

१) देव इस्त्राएलावर, शुद्ध मनाच्या लोकांवर खरोखर कृपा करणारा आहे.

२) मजविषयी म्हणाल तर माझे पाय लटपटण्याच्या लागास आले होते; माझी पावलें बहुतेक घसरणार होती.

३) कारण दुर्जनांचा उत्कर्ष पाहून मी गर्विष्ठांचा हेवा करुं लागलो.

४) त्यांस मरणयातना नसतात, ते शरीराने धडधाकट व पुष्ट असतात.

५) मानवजातीप्रमाणे त्यांना क्लेश होत नसतात, इतर मनुष्यांप्रमाणे त्यांस पीडा होत नसतात;

६) म्हणून अहंकार हा त्यांच्या कंठीचा हार बनला आहे. बलात्कार हा त्यांस वस्त्रांप्रमाणे आच्छादन झाला आहे.

७) पुष्टतेमुळें त्यांचे डोळे बाहेर येतात; त्यांच्या मनांतील कल्पना उचंबळतात.

८) ते थट्टा करितात व दुष्टतेंने जुलमाच्या गोष्टि बोलतात; ते मोठ्या डौलाने भाषण करितात.

९) ते आपले तोंड आकाशापर्यंत पोंचवितात; त्यांची जीभ पृथ्वीवर मिरविते.

१०) यामुळे त्यांचे लोक त्यांजकडे वळतात, आणि त्यांच्याजवळचे पाणी भरपूर पितात.

# तुम्ही स्वत:स एका महत्वाकांक्षी अशा व्यक्तिंत बदला

CHANGE AS GOAL ORIENTED PERSON!

## The ambition of the goal oriented person is greater than his life!

## (पास्टर एस्. सॅम. सेल्वाराज) संदेश

या जगात विशिष्ठ महत्वाकांक्षा बाळगून जीवन जगणारे असे अनेक लोक आहेत. आपण ख्रिस्तीजनांना देखील जगीक जीवनासाठीच केवळ महत्वाकांक्षा असू नये, तर आत्मिक जीवनात देखील विशिष्ठ महत्वाकांक्षा असावी. एक विशेष अशी आत्मिक जीवनात देखील विशिष्ठ महत्वकांक्षा असावी. एक विशेष असे आत्मिक जीवन जगण्याकरिता आपल्याला भक्कम आत्मिक पाया असावयास हवा. एखाद्याला जर आत्मिक महत्वाकांक्षा नसेल तर तो/ती विजयी जीवन जगू शकत नाही.


एखाद्याला त्याच्या जीवनात काहि विशेष असावे असे वाटत असेल तर त्याला स्वतंत्र विचारसरणी हवी. ज्यांच्याकडे चांगल्या महत्वाकांक्षा असतील आणि जीवनात उद्दीष्ट ठरवलेले असेल तर ते वेळेनुसार स्वत:स बदलणार नाहित. ते त्यांच्याकडे अगोदरच असणाऱ्या आत्मिक उदीष्टांपासून टळणार नाहित. आपला विश्वास कशावर आहे हे जोपर्यंत स्पष्ट नाहि, तोपर्यंत आपण यशस्वी जीवन जगू शकत नाही!

जे आपल्या मत (पटलेल्या निश्चिततेत) सतत बदलत असतात. त्यांची तुलना सभोवती वळवळणाऱ्या सर्पाशी होऊ शकते. जे त्यांच्या मतात ठाम-स्थिर असतात तेच महान पुढारी बनू शकतात आणि इतरांकरिता आशीर्वादाचे साधन बनू शकतात. **"...असा मनुष्य दोन मनाचा असून आपल्या सर्व मार्गात चंचल असतो."** (याकोब १:८)

### १) परमेश्वराची उपासना आणि सेवा करण्यात महत्वाकांक्षी असलेले लोक :

**यहोशवा २४:१५ या वचनात आपण वाचतो, "परमेश्वराची सेवा करणे हे तुम्हांस गैर दिसत असेल तर तुम्ही कोणाची सेवा करणार हे आज तुम्ही ठरवा;... मी आणि माझे घराणे तर परमेश्वराचीच सेवा करणार".** येथे असा प्रश्न आहे : "तुम्ही कोणाची सेवा करणार?" आपण सर्वजण प्रभु येशू

(...पान ३ वर)



# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

(ECHO GROUP)



*Pr. Sam Selva Raj with daughter Angeline and son Alex*

**आमचे कार्याविषयीचे धोरण**

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**CORE LEADERS**
Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah

**E.mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call


**"...मी तुला अंतर देणार नाहि, तुला टाकणार नाही."** (यहोशवा १:५)

प्रभुमधील अतीप्रिय बंधु आणि बहिणींनो,

आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या मधुर नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा.

प्रभुने आम्हाला जगभरात त्याच्या वचनाचा प्रसार करण्याकरिता पुरविलेल्या अद्भूत आशिर्वादाबद्दल त्याची स्तुती करीत आहोत. तुमच्या प्रेमाबद्दल, काळजी बद्दल, आणि आधारा बद्दल आम्ही आभार मानीत आहोत.



*Nehemiah Bible College*

प्रभु येशु ख्रिस्ताच्या कृपेद्वारे आम्ही आमच्या बहुतेक सर्व कार्यक्रमांना परत एकवार सुरवात केली आहे. तरुण लेकरांना तयार करण्याकरिता आम्हाला आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन शाळे**करिता उत्तम शिक्षणतज्ञांचा गट उपलब्ध करुन देवून आशीर्वादीत केले आहे. तद्वतच आमचे **नहेम्या बायबल कॉलेज** १५ उच्च्य दर्जाच्या इश्वरज्ञानी प्राध्यापकांच्या मार्गदर्शना खाली तरुण पुरुष आणि स्त्रियांना वैभवी शुभवर्तमान पुढील पीढीला नियमीत आणि निासी, त्याचप्रमाणे पत्रव्यवहाराद्वारे करण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांद्वारे प्रशिक्षित करीत गांभिऱ्याने पुढे वाटचाल करीत आहेत.




*St. Paul's Matriculation School*

आमच्या सोबत एकूण १६ भाषांमध्ये प्रसिद्ध करण्यात येत असलेल्या याचिका करिता २५ शास्त्र अभ्यासक सह संपादक आणि सहसंपादकाची मदतनीस बद्दल प्रभुचे आभार मानित आहोत. प्रभु येशूने आमच्या शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय आणि प्रशासकीय कार्यालय परिश्रमपूर्वक काम करणारे असे देवाचे सेवक देवून सिद्ध केले आहे. देवाचे कार्य जलद गतीने करण्याकरिता आम्हाला अधीक सेवकांची गरज आहे.



आमच्या मुख्य मंडळीत दर रविवारी पहाटे ५.३० वाजल्या पासून ते रात्री ८.०० वाजेपर्यंत तामिळ, इंग्रजी, तेलगू आणि हिन्दी अशा चार भाषांमध्ये सहा उपासना होत आहेत. आमच्या शाखा मंडळ्या देखील त्यांच्या विभागात त्यांच्या शाखा पाळक आणि सहकारी पाळकांद्वारे प्रभावी रित्या कार्यरत आहेत.



*Sunday Church Services*

आमच्या मुख्य मंडळीतील कार्यकर्ते मिनी बस मधून दर रविवारी शाखा मंडळ्यांना भेट देतात आणि लहान

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ◘ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ◘ Online Courses ◘ Theological Correspondence Courses (2 languages) ◘ Church Planting ◘ Nehemiah Bible Colleges ◘ Gospel Printing Press ◘ Great Commission Partners ◘ St. Paul's Matriculation School ◘ Crusades ◘ Community Development

लेकरांमध्ये सेवा करुन उत्तम नागरिक तयार करीत आहेत. आम्ही ३१ ऑगस्ट २०२२ रोजी पूर्ण दिवसभर, आमच्या मंडळीतील तरुण, बायबल कॉलेजचे विद्यार्थी आणि मंडळीच्या पुढाऱ्यांकरिता शिबीर आयोजीत केले होते. त्यांत बेंगलोर येथील रेव्ह. डॉ. सनी प्रसाद हे प्रमुख वक्ते होते. रेव्ह. नयन राजन वीरो गुजराथ येथून आमच्या भेटीस आले, आमच्या सोबत राहिले व आमच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता १५ ते २० ऑगस्ट या दिवसात विशेष अभ्यास वर्ग घेतले.



*Rev. Sam Selva Raj &*
*Rev. Nayan Ranjan Beero*

भारतात आणि शेजारील देशात सुवार्ता प्रसारा करिता जे असे लोक परिश्रम घेत आहेत त्यांच्यासाठी आम्हाला तुमच्या प्रार्थनांची गरज आहे.

आम्ही तुमच्याकरिता सतत प्रार्थना करीत आहोत याची खात्री बाळगा. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

ख्रिस्ताची सेवा करीत आहोत हे खरे आहे. परंतु केळ प्रभु येशू ख्रिस्ताचीच सेवा करीत आहोत कां?

यहोशवाच्या जीवनाविषयी अध्याय २४ वाचत असताना आपल्याला समजते की त्याला मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागले. देव यहोशवाशी बोलला, "मी इस्त्राएल लोकांना मिसरातून बाहेर आणिले; त्यांना अगदी सुरवातीपासून आशीर्वाद दिला व त्यांना माझे नांव दिले. मदतीसाठी त्यांनी धावा केला. तेव्हा मी त्यांच्या सोबत होतो आणि त्यांना आधार दिला. सर्व अंधकारातून त्यांना सोडवून तांबडा समुद्र कोरड्या जमिनीवरून चालत पार करण्यास लावले. मिसरची सेना त्यांच्या पाठलाग करू लागली, तेव्हा त्यांना सुटकेकरीता मार्ग तयार केला. "देवाने इस्त्राएलांकरीता ज्या सर्व चांगल्या गोष्टी केल्या त्या त्यांना सांगून झाल्यानंतर, आता यहोशवा त्यांना विचारीत आहे, "**तुम्ही कोणाची सेवा करणार?**"

**देवाची सेवा करण्याकरिता आपल्याला महत्वाकांक्षा असली पाहिजे. त्यात देवाची सेवा करण्यास आपल्याला दृष्टांत आणि प्रकटीकरणाची खाली असली पाहिजे. आज ज्यांचे तारण झालेले आहे आणि बाप्तिस्मा झालेला आहे असे लोक त्यांच्या परिस्थितीनुसार बदलत असलेले पहाताना दु:ख वाटते. त्यांना झालेल्या दृष्टांतात देवाची सेवा करण्यास ते भक्कम नसल्यामुळे, परिस्थिती आल्यावर ते बदलतात!**

यहोशवा म्हणतो, "**परंतु मी आणि माझे घराणें तर परमेश्वराचीच सेवा करणार.**" तेव्हा लोकांनी उत्तर दिले, "परमेश्वराचा त्यागकरून अन्य देव पुजणें हें आम्हांकडून न घडो." ज्यांच्यावर आपली अधीक प्रीति असते त्यांची आपण उपासना करतो. देवाची देखील त्यांच्या लेकरांकडून अपेक्षा आहे, की त्यांनी त्यांची आणि केवळ त्याचीच उपासना करावी. तो याबाबतीत अतिशय ईर्षावान आहे. बदलत्या-समयानुसार त्यांचा विश्वास आणि सिधांत बदलणाऱ्या लोकांविषयी तो संतुष्ट नसतो. आत्मिक दृष्टिकोन असलेल्या आणि त्यानुसार जगणाऱ्या लोकांनाच तो आशीर्वाद देईल. अनेक लोकांना ते देवाची उपासना करण्यासाठी आणि त्याला अनुसरण्यासाठी त्यांना अनुकूल नसलेल्या परिस्थित असल्या सारखे वाटते. अनेकांना जरी येशूला अनुसरावेसे वाटते, तरी त्यांचा समाज त्यांना तसे करण्याची परवानगी देत नाहि. परंतु मला तुम्हाला आठवण करून द्यावीशी वाटते, "देव त्यांच्या लेकरांना कदापी त्यागणार नाहि." तो खात्रीपूर्वक संपूर्ण कुटुंबाचा बचाव करील : "**प्रभु येशूवर विश्वास ठेव, म्हणजे तुझें व तुझ्या घराण्याचे तारण होईल.**" (प्रे.कृ. १६:३१). जर कुटुंबातील एकाने प्रभुचा स्विकार केला तर देवाचे वचन आश्वासन देते की कुटुंबातील सर्वजणांचे तारण होईल.

ख्रिस्ताला खरेपणाने अनुसरलेला कोणीहि मार्ग चुकून दुसरीकडे वळला नाही. आज देखील आम्ही पाहात आहोत की, जगातील महान असे पुढारी हे येशूची सेवा करणारे आहेत. देव स्वत: संपूर्ण जगावर राज्य करीत आहे. सर्व देशांतील लोक त्याच्या सामर्थी नामाच्या ओळखीमध्ये एकत्र येत आहेत. यहोशवाप्रमाणे, आपण सर्वजण देखील प्रभुची सेवा करुया आणि आपल्या कुटुंबातील प्रत्येकाला निरंतर प्रभुची सेवा करण्याची दृढ महत्वाकांक्षा असू देवू या!

तुम्ही जर 'गुप्त ख्रिस्ती' आहात आणि उघडपणे ख्रिस्ताचा स्विकार करीत नाहि, तर तुम्हाला तुमच्या जीवनशैलीत बदल करण्याची वेळ आली आहे. येशू म्हणत आहे, "**जो कोणी मनुष्यांसमोर मला स्वीकारील त्याला मीहि आपल्या स्वर्गातील पित्यासमोर स्वीकारीन.**" (मत्तय १०:३२)

पवित्र शास्त्र तुम्हाला, तुम्ही नेहमीच भयभीत जीवन जगण्याची परवानगी देत नाही. आपल्या प्रार्थना जर स्वर्गापर्यंत पोहचावयाच्या असतील तर, देवाने

आपल्या जीवनात जे केले त्याची सावजनीक कबूली दिली पाहिजे. अशाप्रकारे येशूकरिता धाडसानें जगा. यहोशवा हा बायबल मधील ऐतिहासिक व्यक्तिमत्व आहे, ज्याच्या जीवनात देवाने महान असे चमत्कार केले आणि अद्भूत प्रकारे मध्यस्थी केली! त्याचा समाज देवासमोर त्याला संतोषविणारे जीवन जगण्यास अपयशी ठरले, अशावेळी तो तो त्याच्या आत्मिक खात्रीत स्थिर होता, आणि त्याच्या लोकासमोर आणि त्याच्या देवासमोर विजयी जीवन जगला. अशा प्रकारे, तुम्ही जरी प्रतिकूल परिस्थितीत जगत आहात, प्रभु येशूची सेवा करणारा असा महत्वकांक्षी मनुष्य म्हणून तुम्ही यशस्वीरित्या, बाहेर पडू शकता.

## २) देवाला आणि देवाच्या मंडळीला प्रथम स्थान देणारे असे महत्वाकांक्षी लोक:

बायबल म्हणते, **"तुम्ही प्रथम त्याचे राज्य व त्याची धार्मिकता मिळवावयाची खटपट करा; म्हणजे यांबरोबर तीही सर्व तुम्हांस मिळतील."** (मत्तय ६:३३) येशू इच्छितो कि, आपण प्रथम त्याचे राज्य मिळवावे. परंतु जगीक लोकाना पैसा मिळवावासा वाटतो आणि त्यांना वाटते कि केवळ पैशाद्वारेच सुख-समाधान प्राप्त होऊ शकते; परंतु बायबल त्याच्या उलट जाहीर करते! स्वर्गीय राज्यापर्यंत पोहचण्याकरिता तुम्ही मार्ग शोधता तेव्हा या जगातील आवश्यक असणारा प्रत्येक आशीर्वाद तुमच्या मागे मागे येईल. जगीक आशीर्वादांबद्दल आपण जेव्हा चिंता करतो, तेव्हा त्याबद्दल येशू म्हणतो, **"अहो अल्पविश्वासी"** (मत्तय ६:३०). साधारणत; ज्या गोष्टि विषयी आम्ही चिंता करावयास हवी त्याबद्दल चिंता करीत नाही. उलट कमी महत्वाच्या गोष्टिंबद्दल चिंता करीतो. आम्ही काय खावे, काय पांघरावे आणि आमच्या जगीक गरजांबद्दल चिंता करु नये; देव जर रानातील फुलांना सुंदर अशा रितीने उगवतो आणि पक्षांना व जनावरांना खावयास देतो, तो तुम्हाला आणि मला पुरवू शकत नाही कां? जसे, आपण यहोशवा बद्दल वाचतो, आपणा समोर येथे प्रश्न उभा राहतो : **"तुम्ही कशाबद्दल चिंता करिता?"**

उत्तर आहे, "आपण देवाचे राज्य आणि त्याची धार्मिकता मिळविण्याबद्दल चिंता करावी." परंतु आजचे ख्रिस्तीजन सर्वप्रथम जगातील आशीर्वाद मिळवितात आणि प्राधान्य जगीक गोष्टिंना देतात; देवाचे राज्य आणि त्याची धार्मिकता हि त्यांच्या करीता दुय्यम बाब असते. परंतु त्यांनी हे लक्षात ठेवावे कि त्यांनी अपयशाच्या मार्गाकडे जाण्यास सुरवात केलेली आहे!

अहो, बंधुनो आणि बहिणींनो! तुम्ही खिन्न झाला आहात आणि पराभूत झाल्यासारखे वाटत आहे कां? तुम्ही कुटुंबातील सर्वांना एकत्रीत करून येशूला प्रार्थना केली, तर तो तुमचे सर्व ओझे आणि चिंता दूर करील; तुम्ही कर्जमुक्त व्हाल; तुमचे कुटुंब आणि लेकरें आशीर्वाद पावतील, तुमच्या लेकरांचे भविष्य चांगले असेल. तुम्ही तारुण्यातच तुमचे जीवन ख्रिस्त येशूमध्ये चांगल्याप्रकारे जगण्याचा निर्धार केला आणि तुमच्या वृद्धावस्थेत मागे वळून पाहिले; तर तुम्हाला दिसून येईल कि तुम्ही खरोखरीच विजयी जीवन जंगलात! देवाचे भय बाळगणाऱ्यांना बायबल आश्वासन देते, "तुं आपल्या श्रमाचें फळ खाशील" (स्तोत्र १२८:२) असे आशीर्वाद प्राप्त होण्याकरीता, देवाचे राज्य मिळविण्यासाठी प्रयत्न करा.

देवा प्रति तुमची सेवा जुन्या नियमांविरहीत आणि बाह्यप्रभावा विरहीत असावी. तुम्ही जगीक प्रतिफळाची अपेक्षा न करता कार्य करीता, तेव्हा देव संतुष्ट होऊन स्वर्गातून तुम्हाला आशीर्वाद देईल. तुमची सेवा छोटी असो किंवा मोठी असो, आनंदाने स्विकारा आणि मन लावून करा. ती तुमच्याकडे परिपूर्ण आशीर्वाद घेऊन येईल. देव तुमच्याकडे त्याची समयोचीत मदत पाठविल. तो या जगातील सर्व आजार आणि दुःखात तुमचे सांत्वन करील. तुमच्या जीवनाच्या शेवटापर्यंत, तो तुमच्या सर्व गरजा पुरविण्यास समर्थ आहे.

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यमः हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल

डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES
SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार
# प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ ऑक्टोंबर २०२२ ते १८ नोव्हेंबर २०२२ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ ऑक्टोंबर** : शुभवर्तमान न पहोंचलेल्या विभागात ते नेण्यास कृपेने मदत केल्याबद्दल.

**२० ऑक्टोंबर** : आमच्या मुख्य आणि शाखा मंडळ्यांत अधिक विश्वासणाऱ्याची भर घालून आशीर्वाद दिल्या बद्दल.

**२१ ऑक्टोंबर** : मुख्य मंडळीतील पुरुषांच्या सभेवरील त्याच्या आशीर्वादाबद्दल.

**२२ ऑक्टोंबर** : आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषांमध्ये प्रकाशने छापून ती मिशन क्षेत्रांमध्ये पाठविण्यास आशीर्वाद दिल्याबद्दल.

**२३ ऑक्टोंबर** : आमच्या **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्रव्यवहाराद्वारे** करण्यात येत असलेला **अभ्यासक्रम** या सर्वांवरील आशीर्वादाबद्दल.

**२४ ऑक्टोंबर** : मुख्य मंडळीतील स्त्रियांच्या सभेकरीता.

**२५ ऑक्टोंबर** : नियमीतपणे थियॉलॉजीकल शिबीर आयोजीत करणे शक्य होऊ देत असल्याबद्दल.

**२६ ऑक्टोंबर** : १९६९ पासून मासिक प्रसिद्ध करण्यातील आमच्या जबाबदारीत त्याचा आशीर्वाद असल्याबद्दल.

**२७ ऑक्टोंबर** : आमच्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावरील त्याच्या आशीर्वादाच्या वृष्ठिबद्दल.

**२८ ऑक्टोंबर** : आमच्या प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजन्म भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदारांवरील त्याच्या दयेबद्दल.

**२९ ऑक्टोंबर** : त्याच्या कृपायुक्त आशीर्वादा द्वारे **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यास ५४व्या वर्षात पदार्पण करण्यास दिल्याबद्दल.

**३० ऑक्टोंबर** : ५४व्या वर्षातील पदार्पण दर्शविण्याच्या परिषदेच्या आयोजनाकरिता मदत केल्याबद्दल.

**३१ ऑक्टोंबर** : इतर संस्थांच्या सेवा कार्याला मदत करणे शक्य होऊ देत असल्याबद्दल.

**०१ नोव्हेंबर** : मागील महिन्यातील आमच्या सर्व आर्थिक आणि आत्मिक गरजा पुरविल्याबद्दल.

**०२ नोव्हेंबर** : मागील महिन्यातील **एको ऑफ हिज कॉल**च्या सर्व कार्यक्रमांबद्दल.

**०३ नोव्हेंबर** : आमचे पास्टर एस्.सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाला विपुल आशीर्वाद देत असल्याबद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०४ नोव्हेंबर** : आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता.

**०५ नोव्हेंबर** : आमच्या सेवेतील सर्व भागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता.

**०६ नोव्हेंबर** : आमची बहिण जेसी विणा सॅम. सेल्वा राज पुन: आजारी आहे.

**०७ नोव्हेंबर** : आमच्या वरिष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास यश प्राप्त व्हावे.

**०८ नोव्हेंबर** : सर्व ख्रिस्ती संस्था आणि मिशनऱ्यांसाठी.

**०९ नोव्हेंबर** : जगातील सर्व देशांमधून करोना महामरीचे समुळ उच्चाटन व्हावे.

**१० नोव्हेंबर** : जागतीक शांततेकरिता.

**११ नोव्हेंबर** : जगभरातील सर्व स्त्रिया व लेकरांचे देवाने अत्याचारापासून रक्षण व्हावे.

**१२ नोव्हेंबर** : या महिन्यातील **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्यासाठी निधी उपलब्ध व्हावा.

**१३ नोव्हेंबर** : सर्व ख्रिस्ती संस्था आणि मंडळ्या आशीर्वादीत व्हाव्यात आणि त्यांचे संरक्षण व्हावे.

**१४ नोव्हेंबर** : आपल्या देशात सर्व प्रकारे ऐक्य प्रस्थापित व्हावे व प्रगती व्हावी.

**१५ नोव्हेंबर** : सर्व विश्वासणाऱ्यांचे नेत्र प्रकाशीत व्हावेत.

**१६ नोव्हेंबर** : **नहेम्या बायबल कॉलेज**च्या विद्यार्थ्यांकरिता आणि त्यांच्या आभ्यासाकरीता.

**१७ नोव्हेंबर** : या शैक्षणिक वर्षाकरिता **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** मध्ये प्रवेशासाठी अधीक विद्यार्थी मिळावेत.

**१८ नोव्हेंबर** : आमचे वरिष्ठ पालक पास्टर सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे सर्व दुष्ट शक्तिपासून रक्षण व्हावे.

(...पान ४ वरुन)

देवाच्या हाताद्वारे प्राप्त होणारे आशीर्वाद हे भरपूर, परिपूर्ण आणि उत्तम असे असतात. देवाकडून वरील सर्व आशीर्वाद प्राप्त करुन घेण्यास आपण मात्र देवाचे राज्य आणि त्याची धार्मिकता प्राप्त करण्याकरीता खरी महत्वकांक्षा असणारी व्यक्ति बनले पाहिजे.

### सर्व मिळून मंडळीमध्ये एकत्रीत व्हा :

हल्ली फार मोठ्या संख्येने ख्रिस्तीजन रविवारी देवाची आराधना करण्याकरीता उपासना मंदिरात येण्याचे टाळतात-दुर्लक्ष करतात. या द्वारे ते सिद्ध-करितात कि त्यांना देवाने देवू केलेल्या त्यांच्या मंडळीशी त्यांची योग्य प्रकारची बांधीलकी किंवा जवळीक नाही. ते चुकीच्या रितीने त्यांना देवाने दिलेल्या पाळकांना आणि मंडळ्यांना सोडून अकल्पित अशा देवाचे सेवक म्हणविणाऱ्या टेलीव्हिजन, यू ट्युब अशाकडे आकर्षिक झालेत. हे अतिशय धोकादायक आहे.

१) देवाच्या मदतीने प्रभु येशू ख्रिस्ताच्या प्रत्येक विश्वासणाऱ्याने चांगला पाळक व मंडळी शोधावी.

२) त्याने त्या पाळकाशी आणि मंडळीशी जवळीक साधावी व मंडळीच्या सर्व कार्यक्रमात सहभागी व्हावे.

३) त्यांनी त्या पाळकाला आणि मंडळीला पूर्णमनाने मदत करावी आणि देव मार्गदर्शन करील तशी त्याची सेवा करावी.

**"जे परमेश्वराच्या मंदिरात रोपलेले असतात ते आपल्या देवाच्या अंगणात समृद्ध होतील."** (स्तोत्र ९२:१३)

### ३) परमेश्वराचे उद्दिष्ट पूर्ण करणारे असे महत्वाकांक्षी लोक :

प्रभु येशू ख्रिस्त या जगात जीवन जगत असताना त्याच्यापुढे उद्देश होता. पुष्कळजण विविध अपेक्षां घेऊन त्याच्यामागे जात होते. त्याला पुष्कळ कामे करावयाची होती आणि त्याच्या पुष्कळ मोठ्या अपेक्षा होत्या. असे असताना देखील, देवाने त्याला ज्या उद्देशाने पाठविले होते ते पूर्ण करण्याची तो काळजी घेत होता:- **"ज्याने मला पाठविले त्यांच्या इच्छेप्रमाणे करावे व त्यांचे कार्य सिद्धीस न्यावे हेच माझे अन्न आहे."** (योहान ४:३४).

या जगात येशूला त्याच्या येण्याचा उद्देश पूर्ण करण्याकरिता पुष्कळ अडखळणे आणि विरोधाला सामोरे जावे लागले. **"तेथे त्यांच्या अविश्वासामुळें त्याने फारशी महत्कृत्ये केली नाहीत."** (मत्तय १३:५८). **"...त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही."** (योहान १:११), त्यांनी त्याचा विरोध केला. (मत्तय ८:३४). **"हा सुताराचा पुत्र ना? असे बोलून त्याची थट्टा केली** (मत्तय १२:५५) **त्याला अनावश्यक प्रश्न विचारल्यामुळे तो दुखावला गेला."** (योहान ८:६), **त्याला फटके मारण्यात आले.** (मत्तय २७:२६). **त्याच्या तोंडावर ते थुंकले** (मार्क १५:१९), **"त्याला वध:स्तंभावर खिळून मारण्यात आले"** (मार्क १५:२४).

अशा या सर्व दु:खदायक-कडवट अनुभवात देखील येशू या जगात येण्याच्या त्याच्या उद्देशांच्या मार्गापासून दूर झाला नाही. तो त्याच्या बापाचा उद्देश पूर्ण करण्याविषयीची महत्वाकांक्षी होता. आपण देखील त्याच्या सारखे बनावे.

**देवाच्या प्रिय लेकरांनो, जीवनात तुम्ही कोणती महत्वाकांक्षा बाळगून आहा? तुम्ही देवाला संतोषविले पाहिजे. तुमच्या देवाची योजना पूर्ण करण्याविषयीच्या महत्वाकांक्षेत तुम्ही स्थिर - भक्कम राहिला तर निश्चितच तो तुम्हाला आशीर्वाद देईल.**

### ४) त्याचे काम पूर्ण करणारे असे महत्वाकांक्षी लोक

**"जे काम तूं मला करावयास दिले ते समाप्त करून मी पृथ्वीवर तुझे गौरव केले आहे."** (योहान १७:४) येशूने अशी प्रार्थना केली; त्यावरुन आपल्याला कळते कि आपणाला देखील दिलेले काम करण्याची जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. प्रेषित पौल म्हणतो, **'पण आता पाहा, मी अंतर्यामी बद्द होऊन रुशलेमास जात आहे, तेथे मला काय काय होईल ते माहीत नाही;**


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

ATA Regd. Candidate for Membership NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL Estd. 1969

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

**केवळ इतकें कळते की बंधनें व संकटे माझी वाट पाहत आहेत, आणि पवित्र आत्मा याची मला नगरोनगरी साक्ष देत आहे. मी तर आपल्या प्राणाची किंमत एवढीसुद्धा करीत नाही, यासाठी की मी आपली धांव आणि मला प्रभु येशूपासून प्राप्त झालेली देवाच्या कृपेची सुवार्ता निश्चितार्थानें सांगवयाची सेवा शेवटास न्यावी.**'' (प्रे. कृ. २०:२२-२४).

प्रभु येशू द्वारे प्राप्त झालेली सेवा पूर्ण करण्याची त्याची इच्छा आहे, असे प्रेषित पौल सांगत आहे. पौल येशुने त्याच्या अगोदर केलेली सेवा पूर्ण करण्याची इच्छा व्यक्त करीत आहे हि नोंद घेण्यासाठी चित्तवेधक बाब आहे. तीच सेवा आपल्या हातात देखील सोपविण्यात आली आहे. देवाने कोणालाही कोणत्याही उद्देशाशिवाय बोलाविलेले नाही. देव एखाद्या मनुष्याची अंधकारातून सुटका करून त्याला स्वत:च्या लेकरासारखे बदलतो, तेव्हा त्याने पूर्ण करण्याकरिता त्याला एक विशिष्ट काम

शेवटपर्यंत त्या उद्देशामध्ये टिकून राहावे आणि देवाने दिलेले काम पूर्ण करावे. आजकाल अनेक जण योजना आखून त्या अमलात आणण्यास सुरवात करतात. परंतु अडखळणाऱ्यांना सामोरे जावे लागते तेव्हा ते माघार घेतात आणि दुसऱ्या दिशेकडे वळतात. सरतेशेवटी मोठ्या अपयशास कवटाळून नाश पावतात जर तुम्हांस दृष्टांत आहे तर तुम्ही स्वत:च्या जीवनापेक्षा त्या दृष्टांतास चिकटून राहिले पाहिजे. महत्वाकांक्षा बाळगणारा इसम शारिरीक मृत्युला घाबरत नाही.

आज हा संदेश देत असताना मला पहात असलेले लोक विचार करतील, ''बंधु, सॅम यांना आता काय समस्या आहे''? ''**परंतु मागील ४८ वर्षे माझा दृष्टांत आणि महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी मला कि ती किंमत मोजावी लागली आणि किती**

*....Contd. to page 9*

## निकडीची बातमी

### तुमच्या मोबाईल संदेशाबद्दल !

आमच्या मित्रांकडून दररोज आम्हाला मोबाईलवर पुष्कळसे फोटो आणि बायबलमधील वचने येत आहेत. वास्तवतेत आम्हाला प्रत्येक संदेश पाहाता येणे शक्य होत नाहि. त्यामुळे ते काढून टाकण्या शिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय नाहि. त्यामुळे आम्ही अतिशय नम्रतेने विनवित आहेत की असे संदेश पाठवणे टाळा. परंतु तुमच्या प्रार्थना, विनंत्या आणि विशिष्ट संदेश आवश्य पाठवा. त्याचे स्वागत आहे. तुमच्या समजुतदारपणाबद्दल आम्ही आभार मानीत आहोत.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला **'न्यु लाईफ फॉर यू'** या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वांनिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**
Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

### मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टला** भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर ''**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**'' च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

# माझ्या तारुण्यातील दुसरी बाजु

## PROGRESS OF MY VISION IN PUBLICATIONS!



बंधु एन्. जीवानंदम्




रेव्ह. एस्. देवदासन

माझ्या शाळेतील दिवसांपासून मला वाचनाची आवड होती. **बंधु एन्. जीवानंदम्** यांचे "Magizzhchi" मासिक आणि **रेव्ह. एस्. देवदासन** यांचे "Herold of His Coming" मासिक हि दोन प्रसिद्ध ख्रिस्ती मासिक माझ्याकरीता एक उत्तेजन देणारी आणि पुढे जाण्यास प्रवृत्त करणारी शक्ति ठरली. मला स्वर्ग आणि पृथ्वी संबंधात ते आशिर्वाद या मासिकांद्वारे प्रभु पासून प्राप्त झाले, ते छापील पानांच्या द्वारे प्रसिद्धीस आणण्याची तीव्र इच्छा होती. परंतु लेखन साहित्य खरेदिसाठी मजकडे आवश्यक ते पैसे नव्हते.


Registered with the Registrar of News Paper
For India under R.N.I. 11967/'67
வருகை யின் தூதன்
Those who turn the world upside down. Acts.17:6.
Vol. 68
செப்டம்பர் 2022 No.9

त्यामुळे मी माझ्या सर्व प्रेरणा आणि प्रकटिकरण यांची नोंद दररोज कागदावर करू लागलो; आणि त्या कागदांवर हात ठेवून, देवाने मला पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन करावे यासाठी प्रार्थना करू लागलो. माझ्या खोलीत लिहिलेल्या कागदांची रास वाढू लागल्यामुळे चिंता वाटू लागली. मग मी कपडे आणि इतर वस्तू खरेदि करण्या ऐवजी, मला खर्चासाठी मिळणाऱ्या पैशांतून अनेक प्रती काढता येईल असा कार्बन कागद, पेन, शाई इत्यादि खरेदि करू लागलो. आणि प्रभुपासून प्राप्त होणारे संदेश त्यावर लिहून काढून तो प्रती इतरांना वाटू लागलो.



ती हस्तलिखीत छापील पाने, मी माझ्या मित्रांना आणि त्यांची भेट होत असे, त्यांना वाटत असे तेव्हा कौतूक करीत असत. थोड्याशा महिन्यांनतर मी टंकलीखीत पाने सायक्लोस्टाईल करुन ती माझ्या डोक्यावर आणि खांद्यावर घेऊन वाटू लागलो. त्यानंतर पुन: कालावधीनंतर मी छापील स्वरुपातील संदेशांची पाने वाटू लागलो आणि नंतर माझ्या संदेश छापण्याच्या सेवेस सुरुवात केली.

सुरवातीस आम्ही **एको ऑफ हिज कॉल** मासिक तामिळ आणि इंग्रजी असे द्वैभाषिक मासिक वृत्तपत्र, त्यानंतर पंधरवड्याने इंग्रजी व तामिळ वृत्तपत्र आणि नंतर ते दोन वेगे वेगळे नोंदणीकृत वृत्तपत्र असे सुरू झाले. आता तामिळ, इंग्रजी, सिंहली, मल्यालम, आफ्रिकन, तेलगू, हिन्दी, कन्नड, मराठी, आसामी, बेंगाली, ऊर्दु, नेपाली, उडीया आणि पंजाबी अशा एकूण १६ भाषांमध्ये एको ऑफ हिज कॉल जागतिक ख्रिस्ती नोंदणीकृत मासिक वृत्तपत्रक असे प्रसिद्ध होत आहे. प्रत्येक भाषिक वृत्तपत्रक भारत सरकार नोंदणीकृत पत्रक झाले आहे. पूर्वी मला माझ्या दुचाकीवरून ती वेगवेगळ्या ठिकाणी पोहचवावी लागत होती. त्यानंतर देवाने मला दूरवरच्या ठिकाणी ती माझी मुलगी एन्जीलीना सेल्वाकुमारी हिच्या मदतीने घेऊन जाण्याकरिता मोटार सायकल दिली.



*Mr. M. Munusami*

मी मासिकाकरीता इंग्रजी आणि तामिळ भाषेत लेख लिहीत असताना, देव मला माझ्या सहसंपादकांद्वारे, भाषांतरकारां द्वारे आणि स्टाफ द्वारे ती कोणतेही अडखळण न येता प्रसिद्ध करण्यात मदत करीत आला आहे.




*Echo of His Call Magazines in 16 languages*



पास्टर सॅम मुलगी एन्जीना सेल्वाकुमारी बरोबर

तुमच्या प्रार्थनांच्या उत्तरातील नांवे :-

बहिण सरिना बेवीन, रेव्ह. डॉ. के. आर. राजशेखरन, डॉ. अे. रिचर्ड सॅम्युएल, रेव्ह. स्टीफन जोसेफ, बंधु. जयरत्ना डीसोजा, बहिण मंजुळा वीरबाहु, बहिण रेणुका राजपक्षा, सुवार्तिक बेंजामिन, मोजेस, बंधु. मोहनकुमार, डॉ. मारीष्टजी नेल्सन, बंधु. एन्. मोहन बाबु, बहिण डॉरथी एस्. थॉमस, रेव्ह. आर. रामकृष्णा, रेव्ह. शशी तिवारी, पास्टर जॉशवा राज, बहिण बोरनाली थापा, शिवेदर कुमार, बंधु. पंकज सी. वाडिया, बहिण राजकुमार भंडारी, बंधु. आशिष रमेश बलधारी, बंधु. एन् पकासम, बहिण गीता गुरुस्वामी, बहिण ई. डेझी रानी, बहिण एस्. थीरुमगल, बंधु. जॉन रॉड्रीक्स, बंधु. सी. ॲन्थोनी राज, बंधु. सी.जे. जोसेफ, बहिण ई. बीसालची, बहिण एस् प्रभावती, बंधु. एम मनी, बंधु. के इंद्रेश कुमार, बंधु. एल. मोहन, बंधु. आर. इम्यबुएल पॉल, आणि बंधु. आर. विजय हे माझ्या दृष्टीने आश्चर्यकारक आहे. **''हे परमेश्वराच्या हातून घडले आहे; हे आमच्या दृष्टिने अद्भूत आहे.''** (स्तोत्र ११८:२३).

**''तो कंगालांस धुळींतून उठवितो, दरिद्रांस उकिड्यावरून उचलून उभे करतो.''** (१ शमुवेल २:८)

***********

पान ७ वरुन

**गुंतवणूक केली याची त्यांना कदाचीत माहिती नसावी. अगणीत अशा प्रसंगात मी शारिरीक अशक्ततेमुळे आणि आर्थिक समस्यांमुळे अत्यंत कठीण परिस्थितीत सापडलो. अनेकदा माझ्या स्वत:च्या नातेवाईकांनी आणि विश्वासू मित्रांनी माझ्या जीवनात समस्या निर्माण केल्या. अद्याप देखील अशा काही शक्ति आहेत. परंतु मी माझ्या विश्वासात खंबीर आहे, कि मला सामर्थ्य देणाऱ्या येशू ख्रिस्तामध्ये सर्व काही करायास शक्तिमान आहे.''** (फिलिप्पै ४:१३). माझा कोणावर विश्वास आहे ते मला ठाऊक आहे. (२ तिमथी १:१२) ईयोबा सहित मी कबूल करतो **''तो मला ठार मारणार तरी मी त्याची आस धरीन.''** (ईयोब १३:१५). या माझ्या खात्रीत मी भक्कम आहे. प्रिय वाचकहो, तुम्ही देखील देवाची सेवा करण्याकरिता एक महत्वाकांक्षा असलेली अशी व्यक्ति बनू शकता का?

यरुशलेममध्ये बंदिवास आणि संकटे त्याची वाट पहात आहेत हे माहित असून देखील संत पौल त्याला देवाकडून झालेल्या पाचारणापासून मागे फिरला नाही. त्याने तीमथीला लिहिले, **''जें सुयुद्ध ते मी केले आहे, धांव संपविली आहे, विश्वास राखिला आहे.''** (२ तीमथी ४:७). धांव धावण्याकरिता, देवाने ठरवून दिले आहे कि आपण पुढे येऊन आपणांस दिलेल्या दानांचा उपयोग करावा.

**''मला लावून दिलेली धांव मी आनंदाने संपविली आहे.'' असे बोलून दाखविणारी व्यक्ति बनण्यास स्वत:त एक महत्वाकांक्षी म्हणून बदलण्यास तयार व्हा.''**

## ५) स्वर्ग हे ज्यांचे ध्येय आहे अशा व्यक्ति :

संत पौल फिलिप्पै ३:१३-१४ या वचनांत म्हणतो, **''बंधु जनहो, मी अद्यापि ते आपल्या कह्यांत आणले असे मानीत नाही, तर मागील गोष्टींकडे दुर्लक्ष करुन व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचा पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणकडे धावतो; हेच एक माझे काम आहे.''** आपल्या प्रत्येकाला एक ध्येय असावे अशी देव आपल्याकडून अपेक्षा करतो. असे ध्येय गाठणाऱ्यांकरिता देवाकडे एक पारितोषिक आहे.

आपले काय ध्येय आहे? ते इतर कोणतेही नसून केवळ 'स्वर्ग' असावे. आपल्या जीवनातील सर्वगोष्टि या ध्येयावर आधारीत ठेवितो, तेव्हा देव अपल्याला आशीर्वाद देतो. जगातील गोष्टिंवर जर आधारीत ठेवला तर निश्चितच अपयशी होणार. 'स्वर्ग' जे आपले ध्येय आहे त्याकडे पुढे पुढे जात असताना जगातील सर्व प्रकारची वासना आणि चांगुपण मागे ठेवून किंवा दुर्लक्षुन क्रुस पुढे ठेवून मार्गक्रमण करावे. शिवाय प्रभु येशू ख्रिस्ताला जे ओळखीत नाहित त्यांना ती करून देण्यास मदत करण्याची इच्छा बाळगावी म्हणजे त्यांना देखील तारण प्राप्त होईल.

**आपले ध्येय 'स्वर्ग' असू देवू या आणि या बहुमुल्य ध्येया पर्यंत पोहंचण्याची महत्वाकांक्षा बाळगू या.**

***********

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल युट्युब

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपाकरुन आमच्या एको ऑफ हिज कॉल युट्युब चॅनल बघा आणि सबस्क्राईब करा. आभार

- संपादक

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-   आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

**RNI NO. 70106/98**
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th OCTOBER 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**